**करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. 44**

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email-rdcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.१८/०३/२०२०

वाचले:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०
४) साथ रोग अधिनियम १८९७

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला आहे. त्यानुषंगाने चीन,इटली, दक्षिण कोरिया, स्पेन, इराण, फ्रान्स, दुबई या करोना विषाणू बाधित देशातून प्रवाशी भारतात येत आहेत.

त्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व बसस्थानके आणि बसेस दररोज निर्जंतूकीकरण करण्यात याव्यात. जिल्हयातील बस स्थानके, बसेस मध्ये स्वच्छता राखण्याच्या आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी आपले स्तरावरुन जिल्हयातील सर्व प्रवासी वाहतूक करणा-या बसेस, विविध कारखान्यांमध्ये कर्मचारी वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या बसेस याची दैनंदिन स्वच्छता होईल यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. या करीता सबंधिताना योग्य ते आदेश दयावेत. तसेच जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका यांचेमार्फत चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील बसगाडया या दररोज निर्जंतूकीकरण करण्यात याव्यात.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति,
१. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, रामवाडी
२. आयुक्त, पनवेल महानगरपालिका
३. प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल.
४.मुख्याधिकारी सर्व

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
१. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
३. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, राजिप, अलिबाग यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग